# माथाडी मंडळांच्या

# कार्यालयीन

# कामकाजाबाबत चौकशी

# अहवाल


सादरकर्ता:

विकास आयुक्त

(असंघटीत कामगार)

महाराष्ट्र राज्य, मुंबई

# अनुक्रमणिका



| अनुक्रमांक | विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | पार्श्वभूमी व संदर्भ | ३ |
| २ | चौकशीची कार्यपद्धती | ४ |
| ३ | माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ - पार्श्वभूमी | ६ |
| ४ | माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ - सद्य:स्थिती | ७ |
| ५ | निरीक्षणे व निष्कर्ष - आस्थापना विषयक व प्रशासकीय बाबी | १० |
| ६ | पदभरती व पदोन्नती | १० |
| ७ | खरेदी व मालमत्ता | ११ |
| ८ | बँकेतील अपहार | १२ |
| ९ | लेखापरीक्षण | १३ |
| १० | निरीक्षणे व निष्कर्ष - अधिनियमातील योजनांची अंमलबजावणी | १५ |
| ११ | नोंदणी | १५ |
| १२ | वयोमर्यादा | १६ |
| १३ | टोळी पद्दत | १६ |
| १४ | मजुरी | १७ |
| १५ | लेव्ही | १८ |
| १६ | हजेरी | १९ |
| १७ | विशिष्ठ प्रकरणे (Case Study) | १९ |
| १८ | अधिनियमाचा दुरुपयोग | २१ |
| १९ | माथाडी रुग्णालय | २५ |
| २० | कल्याणकारी योजना | २७ |
| २१ | सेवा कर | २८ |
| २२ | शिफारशी - आस्थापना विषयक व प्रशासकीय बाबी संबंधित | ३१ |
| २३ | शिफारशी - अधिनियमातील योजने संबंधित | ३२ |
| २४ | परिशिष्ट १ (मंजूर, भरलेले व रिक्त पदे) | ३५ |
| २५ | परिशिष्ट २ (नोंदीत कार्यरत माथाडी कामगार व मालक संख्या) | ३७ |
| २६ | परिशिष्ट ३ (लेव्ही व प्रशासकीय लेव्ही) | ३९ |

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते कि माथाडी मंडळाच्या कार्यालयीन कामकाजाची चौकशी करण्याबाबत दिलेल्या निर्देशाच्या अनुषंगाने चौकशी समितीस विविध माथाडी मंडळानी सादर केलेली माहिती, कागदपत्रे व चौकशी समितीच्या निदर्शनास आलेल्या बाबींच्या अनुषंगाने चौकशी समितीचा अहवाल (एकूण पृष्ठे १ ते ४०) विकास आयुक्त (असंघटीत कामगार) यांच्या कार्यालयाने तयार केला असून, आज दिनांक २० ऑक्टोबर २०१८ रोजी शासनास सादर करण्यात आला आहे.

(विजय शिंदे)
सरकारी कामगार अधिकारी

(सुनिता म्हैसकर)
सहाय्यक कामगार आयुक्त

(पंकज कुमार, भा.प्र.से.)
विकास आयुक्त
(असंघटीत कामगार)

दिनांक: २० ऑक्टोबर २०१८
स्थळ: मुंबई

## पार्श्वभूमी व संदर्भ

शासनाचे पत्र क्र. युडब्लूए-२०१८/प्र.क्र. ९५/काम-५ उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग मंत्रालय मुंबई दिनांक १०.०४.२०१८ अन्वये माथाडी/सुरक्षा रक्षक मंडळाच्या कार्यालयीन कामकाजाची चौकशी करण्याबाबत एक सदस्यीय चौकशी समितीमार्फत चौकशी करण्याबाबतचा निर्णय शासनाने घेतला असून समितीने मंडळाच्या कामकाजाची व मंडळामार्फत राबविल्या जाणा-या योजनांची अंमलबजावणी अधिनियमातील तरतूदीनुसार करण्यात येते किंवा कसे याची सखोल चौकशी करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत.

## चौकशीची कार्यपद्धती

- शासनाचे आदेशाचे अनुषंगाने विकास आयुक्त (असंघटीत कामगार) कार्यालय यांनी दिनांक २३.०५.२०१८ रोजीचे पत्रान्वये सहआयुक्त कामगार यांच्यामार्फत राज्यातील सर्व माथाडी व सुरक्षा रक्षक मंडळाकडून उक्त अधिनियमांअंतर्गत राबविण्यात येणा-या योजना व त्यांच्या अमंलबजावणीची पद्धत, मंडळातील कामगार व मालक प्रतिनिधींची नावे, मागिल ५ वर्षामध्ये प्राप्त झालेल्या लेखी तक्रारी तथा वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या प्रतिकुल बातम्या तसेच लेखापरिक्षणाचा तपशिल सादर करण्यास विलंबाबाबतची कारणे इत्यादी माहिती मागविण्यात आली.
- सदर माहितीचे अवलोकन केल्यानंतर दिनांक २०.०६.२०१८ रोजीचे पत्रान्वये मंडळासंबंधित विविध १७ मुद्दांची माहिती मंडळाकडून मागविण्यात आली सदरची माहिती मध्ये मंडळामधील कर्मचा-यांची कार्यरत पदे, रिक्त पदे भरती करताना बिंदूनामावलीचे पालन केले किंवा कसे, शासनाची मंजूरी घेतली काय? मंडळाकडील नोंदित मालक कामगार संख्या, मंडळाची मजूरी अथवा लेवी स्विकारण्याची पद्धत, मंडळामार्फत केलेल्या खरेदीबाबतचा तपशिल, कामगाराची नोंदणी करण्यासाठीची आवश्यक पात्रता, मंडळामार्फत राबविण्यात येणा-या कल्याणकारी योजना, लेवीचे व्यवस्थापण, लेखापरिक्षणास विलंबाबतचा खुलासा, नोंदणी प्रकिया सोयीची होण्यासाठी सूचविण्यात येणारी सुधारणा व उक्त अधिनियमाचे अंमलबजावणी दरम्यान

बाहय घटकांकडून धमकावून खंडणी वसूल करणेबाबत तक्रार प्राप्त झाली आहे काय ? याबाबत सविस्तर माहिती मागविण्यात आली.

- मंडळाचे कामकाजाबाबत प्रत्यक्ष पडताळणी करण्यासाठी दिनांक ०९/०८/२०१८ रोजी दि रेल्वे गुडस क्लिअरिंग अॅन्ड फॉरवर्डींग एस्टॅब्लिशमेंन्ट् लेबर बोर्ड, मुंबई, दि क्लिअरिंग अॅन्ड फॉरवर्डींग गोदी कामगार मंडळ व मत्स्य उद्योग माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ या मंडळांना भेट देऊन संबंधित मंडळामार्फत चालणा-या कामकाजाची प्रत्यक्ष पाहणी केली
- दिनांक १४/०८/२०१८ रोजी सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा व रायगड जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ यांना प्रत्यक्ष भेट देऊन कामकाजाची पाहणी केली.
- दिनांक १६/०८/२०१८ रोजी मंडळाचे कामकाजाबाबत प्राप्त तक्रारदारांसोबत बैठक आयोजित करण्यात आली
- दिनांक २४/०९/२०१८ मालकवर्ग सोबत बैठक आयोजित करण्यात आली.
- दिनांक २६/०९/२०१८ रोजी माल वाहतूक मंडळ यांना भेट देवून मंडळामार्फत चालणाऱ्या कामकाजाची प्रत्यक्ष पाहणी केली.

## माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ

**पार्श्वभूमी :-**

महाराष्ट्र शासनाने ऑक्टोबर १९६६ मध्ये श्री. शिवाजीराव पाटील, मा. विधानपरीषद सदस्य यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने, माथाडी कामगार कोणत्याही मालकाचे प्रत्यक्ष कामगार म्हणून गणले जात नसल्यामुळे, त्यांना कामगार कायद्याचा लाभ मिळू शकत नाही आणि अशा परिस्थितीत या असंरक्षित कामगारांसाठी काम व सेवाशर्तींचे नियमन करण्सायाठी एक वेगळा कायदा करण्यात यावा असे मत शिफारशीद्वारे व्यक्त केले. असा वेगळा कायदा करून कामगारांचे तास, आठवडयाची सुट्टी, रजेचा पगार, भविष्य निर्वाह निधी, अपघाताबाबत नुकसान भरपाई इ. लाभ मिळू शकतील असे समितीने सूचित केले. अशा कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी व त्याद्वारे नोकरीचे नियमन व वरील लाभ मिळवून देण्यासाठी माथाडी बोर्ड / मंडळ यांच्या माध्यमातून कायद्याद्वारे यंत्रणा निर्माण करण्याची समितीने शिफारस केली. अशा मंडळावर असंरक्षित कामगार, मालक व शासनाचे प्रतिनिधी नेमण्याची तरतूद असावी अशी पण समितीने शिफारस केली.

२. समितीच्या अहवालाच्या अनुषंगाने, शासनाने विधिमंडळात विधेयक सादर केले. हे विधेयक (बिल) विधिमंडळाने संमत केल्यानंतर व मा. राष्ट्रपतींनी अनुमती दिल्यानंतर "**महाराष्ट्र माथाडी, हमाल आणि इतर श्रमजीवी कामगार, (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९**" हा कायदा (ज्यास यापुढे संक्षिप्तपणे माथाडी कायदा असे संबोधले जाईल) मंजूर झाला. नोकरीच्या नियमनामध्ये कामगारांचे पगार निश्चित करणे, पगारवाढ, पगारी रजा, कामाचे तास, विश्रांती, साप्ताहिक सुट्टी, जादा

कामाची मजुरी, वार्षिक पगारी रजा या बाबींचे नियमन करण्यात येतात. कल्याणकारक तरतुदीमध्ये भविष्य निर्वाह निधी, निवृत्ती वेतन, दुखापत झाल्यास नुकसान भरपाई, आजारपणासाठी पगारी रजा, वैद्यकीय मदत या बाबत तरतूद आहेत. ह्या स्वरुपाची सामाजिक सुरक्षा उपलब्ध करण्यासाठी व्यापाऱ्यांकडून लेव्ही वसूल करण्याचे अधिकार मंडळास कायद्याने दिलेले आहेत.

३. महाराष्ट्रातील हमाल, माथाडी व अंग मेहनतीने मालाची चढ / उतार, माल रचणे, मालाची ने-आण करणे, त्यांचे वजन व मापन करणे, फायलिंग, पृथ्थ:करण करणे, स्वच्छ करणे इ. काम करणाऱ्या असंरक्षित कामगारांसाठी शासनाने महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ चे कलम ६ अंतर्गत ३६ माथाडी मंडळांची स्थापना राज्यात केलेली असुन, सदर मंडळे ही एक किंवा अधिक जिल्हाचे मिळुन होणाऱ्या कार्यक्षेत्राकरीता स्थापन करण्यात आली आहेत.

<u>सद्य:स्थिती :-</u>

१. ३६ माथाडी मंडळाकडे ७२,४४९ मालक नोंदीत असुन १,१५,९६३ माथाडी कामगार नोंदीत आहेत. या ३६ मंडळापैकी ११ मंडळे हे मुंबईमध्ये असुन माथाडी कायद्याच्या अनुसुचीत दिलेली नोकरी निहाय सदर मंडळे स्थापन करण्यात आली असुन सदर मंडळाचे कार्यक्षेत्र हे मुंबई, मुंबई उपनगर जिल्हा, ठाणे, रायगड व पालघर अशा ५ जिल्हाकरीता आहे. मुंबई शिवाय उर्वरीत महाराष्ट्रातील इतर भागाकरीता भौगोलिक क्षेत्राकरीता २५ मंडळे एक किंवा त्यापेक्षा अधिक जिल्हयांकरीता गठीत करण्यात आलेली आहेत. सदर उर्वरीत मंडळाकडे माथाडी

कामगार कायद्यातील बहुतेक सर्वच अनुसुचित रोजगार/नोकरीमध्ये कार्यरत असलेल्या माथाडी कामगाराकरीता माथाडी कायदा व त्याखालील योजना अंमलात आणण्याचे कामकाज देण्यात आले आहे.

२. सदर मंडळाद्वारे मंडळातील नोंदीत माथाडी कामगारांना विविध कामगार कायद्याखाली अनुज्ञेय होणारे संरक्षण व इतर लाभ जसे बोनस, रजा वेतन, सवेतन रजा, पगारी सुट्ट्या, अपघात नुकसान भरपाई, भविष्य निर्वाह निधी, उपदान (ग्रॅच्युईटी) असे लाभ देण्याकरीता व विविध कल्याणकारी योजना राबविणे करीता मंडळाकडे नोंदीत असलेल्या मालकाकडुन त्यांचेकरीता काम करणाऱ्या मंडळाच्या नोंदीत कामगारांसाठी व मंडळ प्रशासन कार्यान्वित ठेवण्याकरीता लेव्ही वसूल केली जाते.

३. शासनाकडुन किमान लेव्हीचा दर ३० टक्के ठरविण्यात आला असुन, माथाडी कायदा व त्याअंतर्गत तयार करण्यात आलेल्या विविध योजनेनुसार ५० टक्के पर्यंत लेव्हीचा दर ठरविण्याचा अधिकार माथाडी मंडळास आहे. लेव्हीचा दर ५० टक्क्यापेक्षा अधिक ठरवावयाचा असेल तर राज्य शासनाच्या अनुमतीने/मंजूरीने अशा लेव्हीचा दर मंडळाला ठरविता येवू शकतो. या लेव्हीच्या दरातुन मंडळ प्रशासनासाठी येणारा खर्च देखील भागविला जातो. त्याकरीता लेव्हीतील काही भाग (टक्का) राखुन ठेवला जातो त्यामुळे माथाडी मंडळ हे देखील आर्थिक दृष्टया शासनावर अवलंबून नाही. थोडक्यात शासनाकडुन मंडळ चालवण्याकरीता प्रशासनावर होणारा खर्च जसे कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते, कार्यालयाच्या इमारतीचे भाडे, स्टेशनरी, पाणी पट्टी, घर पट्टी, वाहन खर्च, त्याकरीता लागणारा इंधन खर्च, टेलिफोन देयके, प्रवास खर्च हे मंडळ स्वतःच्या उत्पन्नातूनच {लेव्हीद्वारे

प्रशासनाकरीता राखुन ठेवलेल्या भागातुन (टक्केवारीतुन) प्राप्त होणाऱ्या उत्पन्नातुन} भागवते. शासनाकडून कोणतेही अर्थसंकल्पीय तरतुद (अनुदान) मंडळाला प्राप्त होत नाही. थोडक्यात मंडळ हे आर्थिकदृष्टया स्वयंपूर्ण आहे. सध्या माथाडी मंडळाकडे प्राप्त होणाऱ्या लेव्हीचा दर ३० टक्के ते ४५ टक्के ठरविण्यात आलेला आहे. सदर लेव्हीतील प्राप्त होणाऱ्या दरापैकी २.२५ टक्के ते ७ टक्के भाग प्रशासकीय खर्चाकरीता वापरण्यात येतो.

४. माथाडी मंडळ हे प्रामुख्याने वर नमुद केलेल्या असंघटित क्षेत्रातील असंरक्षित कामगारांकरीता स्थापन करण्यात आलेले असुन, सदर कामगार हे अंग मेहनतीचे, हमालीचे, मालाची चढ/उतार व त्यांच्याशी संबंधीत अनुषंगीक कामे करतात. माथाडी कामगार कायदा हा एक कल्याणकारी कायदा असुन, गोरगरीब कष्टकऱ्यांसाठी त्यांच्या कल्याणासाठी आणि त्यांना सन्मानाने जगता यावे म्हणून करण्यात आलेला आहे.

५. मंडळ प्रशासन चालवण्याकरीता मंडळावर अध्यक्ष तसेच सचिवांची नियुक्ती शासनाकडुन केली जाते. प्रामुख्याने माथाडी मंडळाचे अध्यक्ष पद हे अपर कामगार आयुक्त किंवा उप कामगार आयुक्त किंवा सहाय्यक कामगार आयुक्त या गट अ च्या शासकिय अधिकाऱ्याकडे दिले जाते, तर सचिव या पदावर सरकारी कामगार अधिकारी या गट ब च्या अधिकाऱ्याची नियुक्ती शासनाकडुन केली जाते. हे दोन अधिकारी व्यतिरिक्त मंडळात कार्मिक अधिकारी, लेखापाल, मुख्य लेखापाल, सहाय्यक लेखापाल, निरीक्षक, रोखपाल, सहाय्यक रोखपाल, लिपिक, लिपिक टंकलेखक, वरीष्ठ लिपिक, वाहन चालक, शिपाई ही पदे कार्यरत आहेत. ह्या पदांवर नियुक्ती संबंधित मंडळामार्फत केली जाते.

## निरीक्षणे व निष्कर्ष:

शासनाने चौकशी समितीमार्फत माथाडी मंडळांची चौकशी करण्याबाबतचे आदेशामध्ये दिलेल्या निर्देशाप्रमाणे, चौकशी समितीस विविध माथाडी मंडळानी सादर केलेली माहिती, कागदपत्रे व चौकशी समितीस निदर्शनास आलेल्या बाबींच्या अनुषंगाने चौकशी समितीचे निरीक्षणे व निष्कर्ष खालील प्रमाणे सादर करण्यात येत आहे.

अ. **आस्थापना विषयक व प्रशासकीय बाबी**

१. पदभरती व पदोन्नती

शासनाने स्थापित केलेल्या सर्व माथाडी मंडळांनी मंजूर पदे भरतांना शासन निर्णय क्रमांक बीसीसी-१०९७/प्र.क्र.२/९७/१६-ब दि.२९ मार्च, १९९७ व बीसीसी-१०९७/प्र.क्र.६३/९७/१६-ब, दिनांक १८ ऑक्टोबर, १९९७ अन्वये बिंदुनामावलीचे पालन करणे अपेक्षीत होते. तथापि फक्त १७ टक्के मंडळांनी बिंदुनामावलीचे पालन केलेले असून उर्वरीत सर्व मंडळांनी वरील शासन निर्णयाचे पालन केल्याचे दिसून येत नाही. तसेच शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्र. प्रानिमं-२००७/प्र.क्र.४६/१३-अ, दिनांक १९ ऑक्टोबर, २००७ अन्वये भरती व पदोन्नती करतांना शासनाची मंजूरी घेणे आवश्यक असताना ही भरती व पदोन्नती करतांना फक्त ४२ टक्के मंडळांनी शासनाची मंजूरी घेतली असून उर्वरीत सर्व मंडळांनी वरील शासन निर्णयाचे पालन केल्याचे दिसून येत नाही.

२. खरेदी व मालमत्ता

शासन निर्णय क्रमांक भांखस-१०८८/ (२५१२)/ उद्योग-६,दि. ०२ जानेवारी, १९९२ व भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उद्योग-४, दिनांक ३० ऑक्टोबर, २०१५ अन्वये शासनाच्या अंगीकृत मंडळामध्ये खरेदी करताना अवलंबवण्याची कार्यप्रणाली नमुंद केलेली आहे तथापि माथाडी मंडळांमध्ये खरेदी प्रक्रीया करताना निविदा प्रक्रीया राबविण्यात आल्याचे दिसून येत नाही. ३६ माथाडी मंडळांमार्फत दैनंदिन कामकाजाकरीता वेगवेगळया सॉफ्टवेअर करीता रुपये २३१४१०२२ /- (दोन कोटी एकत्तीस लाख एक्केचाळीस हजार बावीस मात्र) एवढी रक्कम खर्च करण्यात आलेली आहे व हार्डवेअर करीता रुपये ३७८८६८६४/- (तीन कोटी अठ्ठयाहत्तर लाख श्याऐंशी हजार आठशे चौसष्ट मात्र) एवढी रक्कम खर्च करण्यात आलेली आहे. यावरुन सर्व मंडळांनी वेगवेगळे सॉफ्टवेअर घेतले असल्याचे दिसून येते. सर्व मंडळांचे कामकाज एकसारखे असल्याने यासाठी जर एकच सॉफ्टवेअर खरेदी करण्यात आले असते, तर सदर खर्चात भरपूर प्रमाणात बचत करणे शक्य झाले असते. माथाडी मंडळाकडे कार्यालयासाठी सदनीका, भूखंड, वाहने, भाजीपाला मार्केट येथे व्यापारी गाळे या सारख्या स्थावर व जंगम मालमत्ता असल्याचे दिसून येते. परंतु सर्व मालमत्तेचे प्रॉपर्टी कार्डवर मंडळाचे नाव असल्याचे दिसून येत नाही.

८० टक्के माथाडी मंडळाचे कार्यालयाचे कार्यालय भाडे तत्वावर घेतले आहेत व त्यापैकी ६० टक्के मंडळांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून भाड्याचे

निर्धारण करुन घेतलेले नाही, त्यामुळे सदरच्या भाड्याचे दर वाजवी आहेत किंवा नाहीत याचा बोध होत नाही. ५० टक्के माथाडी मंडळाने वाहन खरेदी केलेले असुन त्यापैकी २३ टक्के मंडळांनी शासनाची मंजुरी घेतलेली नाही. कामाची व्याप्ती लक्षात घेता आवश्यक ठिकाणी वाहन उपलब्ध करुन देण्याची गरज आहे.

### ३. बँकेतील अपहार

३६ माथाडी मंडळांपैकी ४ माथाडी मंडळांमध्ये एकुण रक्कम रु. ५८.३९ कोटींचा बँक अपहार झाल्याचे निदर्शनास आलेले आहे. दि रेल्वे गुडस् क्लिअरींग ॲन्ड फॉरवर्डींग एस्टॅब्लिशमेंन्ट लेबर बोर्ड या मंडळाचे एकूण रु. २५.७० कोटी रक्कमेचा अपहार, मुंबई लोखंड व पोलाद कामगार मंडळ या मंडळाचे रु. ९.५ कोटी रक्कमेचा अपहार तसेच धातू व कागद बाजार आणि दुकाने माथाडी मंडळ या मंडळाचा रु. १९.१९ कोटी रक्कमेचा अपहार झाला असून सदर प्रकरणे न्यायप्रविष्ठ आहे. याबाबत संबंधीत मंडळ / बँकेमार्फत एफआयआर दाखल करण्यात आली आहे. यापैकी किराणा व बाजार दुकाने मंडळाचे मुळ ठेवी ४ कोटी रुपये व त्यावरील व्याज याची पुर्ण वसूली करण्यात आलेली आहे व मुंबई लोखंड व पोलाद कामगार मंडळ, मुंबई या मंडळाचे रु.२.५ कोटी रक्कम आंध्र बँक नवीन पनवेल यांनी रक्कम सुरक्षीत व परत मिळणेबाबत कोणतीही हमी दिलेली नसून सदर प्रकरण सद्य:स्थितीमध्ये न्यायप्रविष्ठ आहे. मुंबई भाजीपाला मंडळात वाहनचालकामार्फत ७८ हजार रुपये इतक्या रक्कमेचा गैरव्यवहार झाल्याचे दिसून येते. त्यापैकी रु.

४५६३०/- वसूल करण्यात येऊन दोषी वाहनचालकास सक्तीने सेवानिवृत्त् करण्यात आले आहे. याबाबत ठेवींच्या सुरक्षीततेच्या दृष्टीने मंडळ स्तरावरील पर्यवेक्षीय नियंत्रण ठेवण्यास हलगर्जीपणा झाल्याचे दिसून येते.

४. लेखापरीक्षण

महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार अधिनियम १९६९ च्या कलम ८ (२) अन्वये माथाडी मंडळाचे वार्षिक लेखापरिक्षण होणे आवश्यक असताना ही कोणत्याही माथाडी मंडळाने लेखापरीक्षण विहीत मुदतीत पुर्ण केलेले नाही. कर्मचाऱ्यांच्या कमतरतेमुळे, लेखाविषयी तज्ञ कर्मचाऱ्यांच्या अभावमुळे लेखापरीक्षण विहीत मुदतीत पुर्ण केले गेले नाही, असे विविध मंडळांचे म्हणणे आहे. जमा व खर्चा बाबत योग्य काळजी घेण्याबाबत मंडळानी दुर्लक्ष केल्याचे दिसून येते. स्थापना झाल्यापासून कधीही वेळेवर लेखा परीक्षण झालेले नाही. परिणामतः मंडळामध्ये बँक ठेवींचे अपहार झाल्याचे दिसून येते. माथाडी मंडळाचे लेखापरिक्षण हे मंडळाकडून नियुक्त सनदी लेखापालामार्फत केल्याचे दिसून येते. तथापि मंडळाच्या आर्थिक व्यवहारावर पर्यवेक्षण ठेवण्याकरीता मंडळांचे लेखा परिक्षण महालेखापाल कार्यालयामार्फत होण्याची आवश्यकता आहे.

वरील सर्व बाबींच्या निष्कर्षावरुन माथाडी मंडळातील भरती प्रक्रीया राबविताना बिंदु नामावलीचे पालन न करणे, कर्मचाऱ्यांची भरती करतांना व पदोन्नती करतांना शासनाची मंजूरी न घेणे, सॉफ्टवेअर व हार्डवेअर यांच्या देखभाल दुरुस्तीवर अवाजवी खर्च करणे, मंडळांच्या इमारतींचे भाडे सार्वजनिक बांधकाम

विभागाकडून निर्धारीत करुन न घेणे, मंडळांचे लेखापरीक्षण वेळेवर शासनास सादर न करणे, तसेच बँकेत गुंतविलेल्या रक्कमेच्या सुरक्षिततेची योग्य काळजी न घेणे, स्वत:च्या (मंडळांच्या) मालमत्तांचे व्यवस्थित हिशोब न ठेवणे, या सर्व बाबी गंभीर असून यांच्यावर योग्य ते नियंत्रण ठेवण्याकरीता सर्व मंडळांचे एकत्रिकरण होणे आवश्यक आहे.

एकत्रीत मंडळाला आयुक्त दर्जाच्या प्रशासकीय अधिकाऱ्यांचे नियंत्रणाखाली आणण्याची आवश्यकता असून मंडळाचे लेखा विषयक कामकाजासाठी मंडळावर महाराष्ट्र वित्त व लेखा विभागातील वरिष्ठ अधिकारा-याची नियुक्ती करणे आवश्यक आहे. मंडळ एकत्रीत झाल्यानंतर मंडळामधील कर्मचा-याची बदली करणे शक्य होईल जेणेकरून एकाधिकार टाळता येईल.

ब. अधिनियमातील योजनांची अंमलबजावणी

१. नोंदणी

सन १९६९ मध्ये असंरक्षित माथाडी कामगारांच्या कामाचे नियमन करण्याकरीता, कामाच्या ठिकाणी सुधारणा करण्याकरीता, त्यांच्या आरोग्य, सुरक्षा व कल्याणासाठी पाऊल उचलण्याकरीता महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार अधिनियम १९६९ पारीत करण्यात आले. राज्यात ३७१०० कारखाने व २६८३८९३ आस्थापना असूनही असे निदर्शनास येते की, दि. ३१.०३.२०१८ पर्यंत ३६ माथाडी मंडळांत फक्त ७२४४९ इतके नोंदित मालक कार्यरत असून ११५९६३ एवढे नोंदित कामगार कार्यरत आहेत. मंडळाची स्थापना झाल्यापासून आतापर्यंत वर्षानुवर्षे मालक व कामगार यांच्या नोंदणीमध्ये घट होत असल्याचे निदर्शनास येत आहे. मंडळांनी मालकांची किंवा कामगारांची नोंदणी करण्याकरीता कधीही कोणते विशेष प्रयत्न केल्याचे दिसून येत नाही. वरील झालेल्या मालकांच्या व कामगारांच्या नोंदी ह्या मालकांकडून आलेल्या माहितीच्या अनुषंगाने करण्यात आल्याचे दिसून येते. अधिनियमामध्ये अर्जाचा नमुना स्पष्ट करण्यात आलेला नसून विविध मंडळांनी त्यांच्या स्तरावर अर्जाचा नमुना निश्चित केलेला आहे. सदर नोंदणी अर्जामध्ये संघटनेचे सभासद असल्याबाबत विचारणा करण्यात आली असून संघटनेच्या सचिवांची अथवा टोळीच्या मुकादमाची स्वाक्षरी घेण्याबाबत सूचना आहे. नोंदणी अर्जात अशी अनावश्यक बाबीं कामगारांचे हिताचे नसून, त्यांना वगळणे आवश्यक आहे) माथाडी मंडळामध्ये नोंदणी करण्यासाठी मंडळाच्या नोंदणी

पद्धतीमध्ये एकसारखेपणा दिसून येत नाही. याकरिता सर्व मंडळांसाठी नोंदणीकरिता ऑनलाईन पोर्टल विकसित करुन नोंदणीची प्रक्रीया सुलभ करणे आवश्यक आहे.

## २. वयोमर्यादा

माथाडी कायदयामध्ये कामगारांच्या नोंदणी करीता किमान व कमाल वयोमर्यादा (१८ वर्ष ते ६० वर्ष) असे स्पष्टपणे नमूद केलेले नाही, आणि सेवा निवृत्तीच्या वयाचा पण उल्लेख नाही. माथाडी कामगारांचे कामाचे स्वरुप हे अंग मेहनतीचे असल्याने नोंदीत कामगारांचे वयाची मर्यादा विहीत करणे आवश्यक असल्याने नोंदीत कामगारांचे किमान वय १८ वर्ष व कमाल वय ६० वर्ष विहीत करणे आवश्यक आहे.

## ३. टोळी पद्धत

माथाडी मंडळात कार्यरत टोळीमधील नोंदीत कामगाराने राजीनामा दिल्यानंतर अथवा नोंदीत कामगाराचा मृत्यू झाल्यास, त्या कामगाराच्या जागेवर नवीन कामगारांची नोंदणी करताना अथवा टोळीमध्ये नवीन कामगाराची नोंदणी करताना २/३ टोळीची संमती घेणे यामुळे नोंदणीस बंधणे निर्माण होत असल्याने सदर बाबीतील अधिनियमामध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे.

४. मजुरी

बहुंताश माथाडी मंडळामध्ये मजुरी अथवा वारई रक्कम रोखीने स्वीकारण्याची पद्धत दिसुन येते. सदरची रक्कम स्विकारण्यासाठी सर्व मंडळाकरिता धनादेश अथवा आरटीजीएस व्दारे रक्कम स्विकारण्याची पध्दती विकसित करणे आवश्यक आहे. टोळीतील कामगरांना त्यांनी केलेल्या कामनिहाय मजुरी अदा करण्याऐवजी काही मंडळामध्ये सरासरी मजुरी अदा करण्याची पद्धती दिसून येते. त्यामुळे कामगारांना त्यांनी केलेल्या कामाचा योग्य मोबदला मिळत नसुन सर्व कामगारांना त्यांनी केलेल्या कामनिहाय मजुरी अदा करण्याची आवश्यकता आहे.

विविध मंडळामार्फत मजुरीबाबतचा तपशील मंडळाकडे जमा करण्यासाठी नमुना १, नमुना २ व नमुना ३ विहित करण्यात आले आहेत. सदरचे नमुना १, २ व ३ चे अवलोकन केले असता विहित नमुन्यातील तपशील पुर्णपणे भरलेला नसून, मंडळामार्फत याबाबत कुठलीही कार्यवाही झालेली दिसुन येत नाही. त्यामुळे मालकाकडुन जमा करण्यात आलेल्या मजुरी व लेव्हीबाबत कामगार, मुकादम व मालक संगनमताने मंडळाकडे कमी लेव्ही भरण्याची शक्यता नाकारता येत नाही. सबब नमुना १, २ व ३ या मध्ये सुधारणा केल्यास कामगारांनी केलेल्या कामाचे अनुषंगाने मजुरी व लेव्ही ची योग्य रक्कम मंडळाकडे भरणे शक्य होईल.

माथाडी मंडळातील कामगारांचे कामाचे स्वरुप एकसारखे असताना कामाच्या ठिकाणनिहाय मजुरीमध्ये प्रचंड तफावत असल्याचे दिसून येते. सर्व मंडळांचे

मजूरीचे दर ठरविण्याची पद्धत एकसारखी नसून ती आस्थापनांवर आधारीत आहे यामुळे समान कामासाठी समान वेतन या तत्वाचे पालन होताना दिसून येत नाही. मजुरीची दर वाढ करताना सदरची दर वाढ ही शासनाचे महागाई दराच्या प्रमाणाशी सुसंगत असल्याचे दिसून येत नाही. याकरिता माथाडी कामगारांच्या मजुरी दरामध्ये कामाच्या स्वरुपानुसार एकसमानता आणण्याची आवश्यकता आहे. माथाडी मंडळ हे नियोक्ता या संज्ञेत मोडत नसल्याने कामगारांच्या मजुरीतुन पतपेढीचे हप्ते, खाजगी बॅक व संस्थांचे हप्ते कपात करणे योग्य वाटत नाही.

## ५. लेव्ही

राज्यातील ३६ माथाडी मंडळामध्ये आकारण्यात येण-या लेव्हीच्या दरामध्ये एकसमानता दिसून येत नाही. सदरचे दर हे ३० % पासून ४५ % पर्यंत असल्याचे निर्दशनास येते. यामुळे मालक वर्गावर असमान आर्थिक भार पडत असल्याचे दिसून येते. तसेच प्रशासकीय लेव्हीच्या दरामध्ये ही प्रंचड तफावत दिसून येत असून सदरचे दर ३ % पासून ते ७ % पर्यंत असल्याचे आढळून येते. सबब सदरचे लेव्ही दर व प्रशाकीय लेव्हीदर या मध्ये समानता आणणे आवश्यक असल्याने, सर्व मंडळांचे एकत्रिकरण झाल्यास या प्रकारच्या बाबींमध्ये एकसूत्रता आणणे सोयीचे होईल.

६. हजेरी

माथाडी मंडळामध्ये नोंदीत कामगार स्वत: काम करतो किंवा त्याऐवजी दुसऱ्या अनोंदीत कामगाराकडून काम करुन घेतले जाते याबाबतची खातर जमा करण्यासाठी कोणतीही विहीत कार्यपद्धती निश्चित केलेली नाही. याकरिता बायोमॅट्रीक हजेरी पद्धती विकसित करण्याची सूचना असून ही कार्यवाही करण्यात आल्याचे दिसून येत नाही.

७. विशिष्ठ प्रकरणे (Case Study)

शासनाची आपले सरकार पोर्टलवर प्राप्त नागपूर व वर्धा माथाडी मंडळाशी संबधीत तक्रारीमध्ये मुख्य मालकास क्रेनचे हूक अडकविण्यासाठी ३ ते ५ मिनिटा करीता रू.१५६०/- माथाडी कामगारांना द्यावे लागतील, असा उल्लेख केलेला आहे. यातून सदर अधिनियमामध्ये मजूरी निश्चित करण्याबाबत कोणतेही निश्चित सूत्र नसल्याने अधिनियमाचा दुरुपयोग करुन अवाजवी दराने मजूरी आकारली जाते असे निदर्शनास येते. सदर प्रकरणाचे अवलोकन केले असता कारखान्यामध्ये मालाची चढ उतार करण्यासाठी मुख्यत: यांत्रिकीकरणाचा वापर केला जात असल्याने माथाडी अधिनियमाच्या अनुसुचीमधून "कारखाने" या घटकास वगळण्याची आवश्यकता आहे.

राष्ट्रीय केमिकल ॲन्ड फर्टीलायझर लिमिटेड या आस्थापनेमार्फत कारखान्यातील खताच्या गोणीचे वजन ५० किलो वरुन ४५ किलो करण्यात आले. सदर कामाच्या बदलामुळे १२ गोणीच्या थप्पी ऐवजी १३ गोणीची थप्पी

लावावी लागते त्यामुळे कामगारांनी वाढीव पगारांची मागणी केली असल्याचे दिसून येते. मजूरीचे दर हे प्रती टन प्रमाणे असून गोणीचे वजन कमी केल्यामुळे गोणीची संख्या वाढली. परिणामी प्रतीदिन मजूरीमध्ये घट दिसून आली, असे कामगारांचे म्हंणणे आहे. व्यवस्थापनाचे म्हणण्या प्रमाणे पूर्वी होत असलेल्या सरासरी लोडिंमच्या तुलनेत २२६ मेट्रीक टन प्रति रेक एवजी शॉर्ट लोडिंग होत असून, एकूण ३ रेक्ससाठी ६८० मेट्रीक टन शॉर्ट लोडिंग झालेला आहे. परिणामी राष्ट्रीय केमिकल ॲन्ड फर्टीलायझर लिमिटेड यांना रूपये ३-४ लाख प्रति रेक एवढे नुकसान होत आहे. त्यामुळे अशा परिस्थितीत माथाडी कामगाराकडून शॉर्ट लोडिंग केल्यामुळे रेल्वेला अतिरिक्त मालवाहतूकीसाठी अदा करावया लागणारी रक्कम वसूल करण्याशिवाय आर.सी.एफ. कडे दुसरा पर्याय नाही, असे व्यवस्थापनाचे मत आहे. संबंधित मंडळामार्फत उक्त प्रकरणी टोळीतील कामगारांची संख्या मध्ये वाढ करून शॉर्ट लोडिंगचा प्रसंग टाळता आला असता. परंतु टोळीतील कामगाराची संख्येमध्ये वाढ करतांना २/३ टोळीची संमती घेणे आवश्यक असल्याने सदर वाढ करता आली नाही. या प्रसंगी अधिनियमाचा दुरुपयोग करुन कामगारांची संख्या वाढविण्या ऐवजी शॉर्ट लोडिंग करून व्यस्थापानास वेठीस धरण्यात आले असे स्पष्ट होते. अधिनियमातील अशा प्रकारची जाचक तरतुदींचे पुनर्विलोकन होणे अत्यंत गरजेचे आहे.

८. अधिनियमाचा दुरुपयोग

माथाडी कामगारांना देय दिवाळी बोनसमधुन ५ टक्के रक्कम संघटनेला देणगी स्वरुपात अदा करण्यासाठी काही माथाडी मंडळांनी ठराव घेतला आहे. महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार अधिनियम १९६९ मध्ये याबाबत कसलीही तरतुद नसल्याने सदरची देणगी स्वरुपात अदा करण्यात येणारी रक्कम बेकायदेशीर असल्याचे दिसून येते. माथाडी अधिनियमाशी अनुसरुन काम करणाऱ्या विविध संघटना या श्रमिक संघ अधिनियम १९२६, च्या अंतर्गत नोंदणीकृत असून या संघटनाना लेखा परिक्षणाचा समावेश असणारा वार्षिक अहवाल निबंधकाकडे सादर करणे बंधणकारक आहे तथापि बहुसंख्य माथाडी संघटनाकडून सदरचा अहवाल विहीत मुदतीत सादर केला जात नाही.

नागपूर व वर्धा जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळाच्या एकाधिकार कामकाज पध्दतीबाबत वृत्तपत्रातील लेखाच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपूर यांनी स्वाधिकाराने जनहीत याचिका क्रमांक ३०/२०१६ दाखल करून नागपूर व वर्धा जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळाच्या अनागोंदी कारभाराबाबत चौकशी होणे अत्यावश्यक असल्याचे दिनांक १८/१०/२०१६ रोजी आदेश दिलेले होते. सबब, मंडळाचे अनागोंदी कारभाराची मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपूर यांचेकडून स्वाधिकाराने घेतलेली दखल गंभीर बाब असून, उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता अधिनियमामध्ये व्यापक सुधारणा होणे आवश्यक आहे.

माथाडी कायदा हा कल्याणकारी अधिनियम असून, त्याअंतर्गत मालक व कामगार यांच्यामध्ये सुसंवाद साधून मालक व कामगारांच्या हितास कोणतीही बाधा येऊ न देता कायद्याची परिणामकारक अंमलबजावणी करणे हा या कायद्याचा मुख्य उद्देश असला तरी या कायद्यातील तरतूदीबाबत मालक वर्ग मोठया प्रमाणात अनभिज्ञता असल्याचे काही प्रकरणामधून शासनाच्या निदर्शनास आले आहे. त्याचा काही तथाकथित संघटना / व्यक्ती यांच्या कडून गैर फायदा घेतला जात आहे. त्यामध्ये माल घेऊन आलेला ट्रक कारखान्याच्या गेटवर थाबवून ड्रायव्हर कडुन माथाडीच्या नावाखाली वाराई/एन्ट्री टॅक्स वसूल करणे, मुख्य मालकाकडे कामगार भरती करीता अनधिकृतरित्या दबाव आणून बेकायदेशीररित्या रक्कमाची मागणी करणे, संघटनेच्या नावाने अनधिकृत लेटर हेड छापून त्याव्दारे खोटा पत्र व्यवहार करणे व माथाडी कायद्याची अंमलबजावणी करण्याचे अधिकार त्यांच्याकडेच असल्याचे भासिविणे व मालकास मंडळात मुख्य मालक म्हणून नोंदीत होण्यासाठी धमकावणे, असे होत असल्याची बाब शासनाच्या निर्दशनास आली आहे. परिणमी मालक वर्गात या कायद्याविषयी प्रचंड धाक व रोष निर्माण झालेला असल्याने कायदयाची परिणाम कारक अंमलबजावणी करण्यासाठी व त्यातील तरतूदीचा काही तथाकथित संघटना / व्यक्ती कडून होणारा दुरुपयोग टाळण्यासाठी शासनाने पोलिस व कामगार विभाग यांनी करावयाच्या कार्यवाही बाबत दिनांक ०६.०९.२०१६ रोजी कृती आराखडा बाबतचा शासन निर्णय निर्गमित केला आहे. तथापि राज्यातील ३६ माथाडी

मडळाकडून प्राप्त अहवालामध्ये नोंदणीकृत मालक अथवा व्यवस्थापनाकडून माथाडी कायदा अंमलबजावणीबाबत बाह्य घटकांकडून धमकावून खंडणी वसूल करणेबाबत बाबतची कोणतीही तक्रार प्राप्त नसल्याचे नमूद केले आहे.

तथापि, चौकशी समितीस प्राप्त माहीतीच्या आधारे, दि. २९.०४.२०१७ रोजी साकीनाका पोलीस ठाणे मुंबई येथे चार आरोपींविरुध्द श्री. गोल्डी पुरुषोत्तम सुत यांनी त्यांच्या आस्थापणेतील कामकाज सुरु असताना माथाडी कामगारांनी येऊन क्रेनने माल उतरवायचे काम माथाडी कामगारांचे असल्यामुळे पैशाची मागणी केली. मालकाने काम केल्यानंतर पैसे देण्यात येईल असे सांगितल्यानंतर क्रेनचालकास परत पाठवले व इतर लोकांस शिवीगाळ व मारहाण करुन जीवे मारण्याची धमकी दिली. या प्रकरणामध्ये भा. द. वि. कलम ३२६, ३२३, ५०४, ५०६(२), ४२७, १४३, १४७ व १४९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, दि. ३ मार्च २०१८ रोजी दोषारोपपत्र न्यायालयात दाखल करण्यात आला असून, प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

दि. २३.१०.२०१७ रोजी श्री. रेन्डोल परेरा यांच्या तक्रारीनुसार युनाईटेड इंडस्ट्रीज यांचेकडे बळजबरीने कामगारांना कामावर ठेवण्यास भाग पाडणे, प्रति वाहन रु २००० ची मागणी करणे व बळजबरीने रु. ६००० घेणे, वाहनाचे टायर मधील हवा सोडणे, या प्रकरणामध्ये शिवडी पोलीस ठाण्यात भा. द. वि. कलम ४५२, ३८६, ५०६ व १२०(ब) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, दोषारोपपत्र न्यायालयात दाखल करण्यात आला असून, प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

दि. ३०.११.२०१७ रोजी श्री. रवींद् शेट्टी यांच्या फॅक्ट्रीमधील किचन इक्वीपमेंट टेम्पो मध्ये घेऊन जात असताना ३ इसमांनी टेम्पो अडवून श्री. शेट्टी व टेम्पोचालक यांच्याकडे आम्ही सर्व जण माथाडी कामगार असल्याचे सांगून मोटारवाहनामध्ये माल भरण्यास स्थानिकाना अधिकार असल्याचे सांगून २०००/- रूपयांची मागणी केली. या प्रकरणामध्ये सहार पोलीस ठाण्यात भा. द. वि. कलम ३८४, ३८५ व ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, दोषारोपपत्र न्यायालयात दाखल करण्यात आला असून, प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

दि. २३.०३.२०१८ रोजी पवई पोलीस ठाण्यात लार्सन ॲण्ड टुब्रो या कंपनीत पडीक भंगार ट्रक मधून बाहेर नेत असताना ३ इसमांनी ते माथाडी कामगार असून पडीक माल क्रेनने भरलेला असतानाही रुपये ५०००/- ची मागणी करुन ट्रक चालकास धमकविण्यात आले. या प्रकरणामध्ये भा. द. वि. कलम ३४१, ३८४ व ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, गुन्हा तपासाधिन आहे.

वरील तक्रारींवरून असे निर्दशनास येते की विभिन्न मालक व व्यवस्थापनास, माथाडी कायदाच्या नावाखाली बाह्य घटकांकडून, धमकावून खंडणी वसूल करण्याचे प्रकरण वारंवार घडत आहे. परंतु वरील तक्रारींबाबत मुंबईतील सर्व माथाडी मंडळ अनभिज्ञ असल्याचे, त्यांच्याकडून प्राप्त माहितीचे आधारे, दिसून येते. कृती आराखडा बाबतचा शासन निर्णय असतांना ही अशा प्रकारचे गंभीर प्रकरण घडून सुद्धा मंडळांमार्फत याबाबत कुठलीही कार्यवाही करण्यात न आल्याने अधिनियमाचा दुरुपयोग टाळण्यास मंडळ असमर्थ ठरल्याचे दिसून

येते. उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता अधिनियमामध्ये व्यापक सुधारणा होणे आवश्यक आहे.

कापड बाजार आणि दुकाने मंडळ मुंबई या मंडळाच्या सहयाद्री नगर, चारकोप, मुंबई येथील घर बांधणी प्रकल्पामधील सदनीकांचे हस्तांतरणाबाबत दि. ११.०९.२००३ रोजी त्रिसदस्यीय मंडळाचे ठरावाद्वारे निकष निश्चित करण्यात आले होते. तथापि दि.२८.०५.२०१२ रोजी एक सदस्यीय मंडळाने नव्याने ठराव करुन सदनिकेचे नातेवाईकास हस्तांतरण किंवा इतरांना विक्री करण्याबाबत ठराव पारीत करुन त्यानूसार २९३ सदनिका हस्तांतरीत केल्या. सदरचा वादग्रस्त ठराव शासनाचे दि. १२.०३.२०१३ च्या पत्रान्वये रद्द केला व संबंधितांविरुद्ध विभागीय चौकशी सुरू केली. सन २०१३ च्या पहिल्या अधिवेशनातील विधान परिषद आश्वासन क्रमांक २९८ व विधान सभा आश्वासन क्रमांक ३७ व ३८ नूसार कापड बाजार आणि दुकाने मंडळातील सदर घर बांधणी प्रकल्पामधील कामगारांचे सदनीका हस्तांतरणाबाबत गुन्हे शाखेकडून चौकशी सुरू करण्यात आली आहे. अधिनियमाचा दुरुपयोग करून विशिष्ठ लोकांना गैरफायदा करून देण्यावरून मंडळांचा नियमबहाय्य व अनागोंदी कारभार दिसून येतो.

## ९. माथाडी रुग्णालय

माथाडी कामगारांना वैद्यकीय सुविधा पुरविण्यासाठी सुमारे १०.५४ कोटी रुपयांची प्राथमिक गुंतवणुक करुन माथाडी हॉस्पीटलची उभारणी करण्यात आली. सदर हॉस्पीटल मार्फत मुंबई, नवी मुंबई, ठाणे, रायगड, ग्रोसरी,

ट्रान्सपोर्ट, रेल्वे, आर्यन स्टील, भाजीपाला, क्लिअरिंग ॲन्ड फॉरवर्डींग आणि मेटल व कागद या मंडळाच्या कामगारांना वैद्यकीय सेवा पुरविल्या जातात. माथाडी हॉस्पीटलचा सन २०१७-१८ मध्ये ३५७४९५ बाहय रुग्णांनी फायदा घेतला असल्याचे दिसून येते. माथाडी हॉस्पीटलच्या सन २०१८-१९ चे अर्थसंकल्पाचे अवलोकन केले असता, रु. २०.२९ कोटी खर्चापैकी रु. १६.४० कोटी (८१%) एवढी रक्कम कर्मचा-यांचे वेतन व प्रशासकीय खर्चासाठी होत असल्याचे दिसून येते. तुलनात्मक दृष्टया कामगारांना पुरविण्यात येणा-या वैद्यकीय सुविधांवर कमी खर्च होत असल्याने माथाडी हॉस्पीटल उभारणीच्या मुळ उद्देश सफल होत नसल्याचे निदर्शनास येते. सबब अतिरिक्त मनुष्यबळ कमी करून प्रशासकीय खर्च नियंत्रणात आणण्याची आवश्यकता आहे.

माथाडी हॉस्पीटलच्या घटनेत विश्वस्त सदस्यांची कालमर्यादा तीन वर्षाची आहे, तथापि सद्यस्थितीत असलेले सदस्य हे मागील चौदा वर्षापासुन कार्यरत आहेत. सन १९९२ मध्ये विश्वस्त मंडळाने नवीन विश्वस्त नियुक्त होईपर्यंत, कार्यरत विश्वस्तच कार्यभार पाहतील असा ठराव पारीत केला होता व सदर ठराव धर्मादाय आयुक्ताकडे पाठविण्यात आला होता. तथापि, सदर ठरावास मान्यता मिळाल्याची कागदपत्रे सदर हॉस्पीटलकडे दिसून येत नाही. सबब सद्यस्थितीत कार्यरत विश्वस्तांच्या कायदेशीर वैधतेबाबत प्रश्न निर्माण होत असून माथाडी हॉस्पिटल (ट्रस्ट) च्या घटने प्रमाणे विश्वस्त नेमणे आवश्यक आहे.

Scan करता आलेला नाही

१०. कल्याणकारी योजना

माथाडी मंडळांमार्फत अधिनियमामध्ये नमुद केल्याप्रमाणे कामगारांच्या आरोग्य सुरक्षा व कल्याणासाठी सामाजिक सुरक्षेची कल्याणकारी योजना माथाडी मंडळांमार्फत राबविण्यात येत असल्याचे दिसून येत नाही. ६ मंडळामार्फत कामगारांच्या मुलांना शिष्यवृत्ती, ७ मंडळाकरीता माथाडी हॉस्पीटल व १५ मंडळामार्फत अपघात विमा पॉलिसी घेतल्याचे दिसून येते. तथापि कामगारांसाठी आरोग्य विषयक शिबीरे, सुरक्षा विषयक साधणे इ. पुरविल्याचे दिसुन येत नाही. सन २००८ मध्ये केंद्रशासनाने पारीत केलेल्या असंघटित कामगार सामाजिक सुरक्षा अधिनियमांतर्गत ९ प्रकारच्या सामाजिक सुरक्षा योजना असंघटीत कामगारांसाठी लागू करण्याची तरतूद असून या योजना माथाडी कामगारांना लागू करण्याची आवश्यकता आहे व त्या योजना पुढिलप्रमाणे आहे.

**केंद्र शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजना –:**

१. जीवन विमा व अपंगत्व विमा योजना
२. आरोग्य आणि प्रसूतीलाभ योजना
३. निवृत्ती वेतन योजना

**राज्य शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजना –:**

१. भविष्य निर्वाह निधी योजना
२. कामाच्या ठिकाणी दुखापत झाल्यास अर्थसहाय्य योजना
३. गृहनिर्माण योजना
४. पाल्यांच्या शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना
५. कामगार कौशल्य वृध्दी योजना

६. अंत्यविधी अर्थसहाय्य योजना
७. वृध्दाश्रम योजना

## ११. सेवा कर

राज्यातील ३६ माथाडी मंडळामार्फत नोंदीत कामगारांना वेतन, भविष्य निर्वाह निधी व उपदान अदा केले जाते. तथापि प्राप्त माहिती आधारे असे निदर्शनास आले आहे की सेवाकर विभागाकडून सातारा माथाडी मंडळास रुपये १० कोटी सेवाकर भरण्याबाबत नोटीस प्राप्त झाले आहे. फायनान्स अधिनियम १९४४ च्या कलम ७३ (१) अंतर्गत माथाडी कामगारांची भरती आणि पुरवठा सेवा पासून प्राप्त मोबदलावर सेवाकर लावण्यात आले. जर सदरचा सेवाकर भरावयाचा झाल्यास तो मंडळाच्या लेव्हीमधून अदा करावा लागेल. त्यामुळे मंडळावर व नोंदीत मालकावर मोठयाप्रमाणात आर्थिक भार पडणार आहे. तथापि पात्र नोंदीत मालक वर्गासाठी मंडळाची भविष्य निर्वाह निधी योजना ईपीएफओ कडे वर्ग केल्यास व असंघटीत कामगार सामाजिक सुरक्षा अधिनियमाअर्तंगत महाराष्ट्र राज्य सामाजिक सुरक्षा मंडळाच्या कल्याणकारी योजना माथाडी कामगारांस लागू केल्यास व कामाचे वाटप बंद केल्यास परिणामत: मंडळाची कामकाजाची कार्यकक्षा कमी होईल व पर्यवेक्षण करणे हे मंडळाचे मुख्य कार्य राहील व सदरच्या सेवाकराचा अतिरिक्त भार सुद्धा टाळता येईल.

वरील सर्व बाबींच्या निष्कर्षावरुन वर्षानुवर्षे नोंदणीमध्ये होणारी घट, मजूरी ठरविण्याचे अनिश्चित सूत्र, रोखीने मजूरी व वारई रक्कम स्वीकारण्याची पद्दत,

मुकादमामार्फत मजूरी व लेव्ही रोखीने स्विकारण्याची पद्दत, केलेल्या कामनिहाय मजूरीच्या ऐवजी सरसकट मजूरी अदा करण्याची पद्दत, नागपूर व वर्धा जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळाच्या एकाधिकार कामकाज पध्दती बाबत वृत्तपत्रातील लेखाच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपूर यांनी स्वाधीकाराने जनहित याचिका क्रमांक ३०/२०१६ मध्ये मंडळाच्या अनागोंदी कारभाराबाबत चौकशी समिती स्थापन करण्याची गरज, मालकाच्या गुंतवणुकीच्या मूळ भाडंवलाचा विचार न करता निर्धारित केलेले अन्यायकारक व अवाजवी दर, मनुष्य बळाचा निर्माण केलेला तुटवडा, अस्तीतवात असणा-या कामगारांना अधीक आर्थिक लाभ मिळावा यासाठी नवीन कामगारांना कामावर घेण्यास केलेला प्रतिबंध, निर्धारीत मासिक वेतनावर विशिष्ट कामगार न देण्याची पध्दत, योजनेशी विसंगत निर्धारण केलेली रजा ज्यामुळे सुट्टीच्यादिवशी दुप्पट दराने प्रदान होणारा वेतन, मालक वर्गात या कायदया विषयी निर्माण झालेला प्रचंड धाक व रोष, कायदयाची तरतूदीचा काही तथाकथित संघटना / व्यक्ती कडून होणारा दुरुपयोग, जे.एस.डब्लयू. स्टील कोटेड प्रोडक्टस्, नागपूर व राष्ट्रीय केमिकल्स एण्ड फर्टिलाइजर्स लिमिटेड, रायगड यांच्याकडून उद्भवलेले प्रसंग, नोंदणी मध्ये एकसुत्रता नसणे, कायद्यात तरतूद नसतांना माथाडी कामगारांना देय दिवाळी बोनसमधुन ५ टक्के रक्कम संघटनेला देणगी स्वरुपात अदा करणे, माथाडी हॉस्पीटल मधील सद्यस्थितीत कार्यरत विश्वस्तांच्या कायदेशीर वैधतेबाबत प्रश्न निर्माण होणे, कापड बाजार आणि दुकाने मंडळातील घर बांधणी प्रकल्पामधील कामगारांचे सदनीका हस्तांतरणाबाबत गुन्हे शाखेकडून चौकशी सुरू असणे,

टोळीमधील नोंदीत कामगाराने राजीनामा दिल्यानंतर किंवा नोंदीत कामगाराचा मृत्यू झाल्यास त्या कामगाराच्या जागेवर नवीन कामगारांची नोंदणी करताना अथवा टोळीमध्ये नवीन कामगाराची नोंदणी करताना २/३ टोळीची संमती घेणे व कल्याणकारी योजनांचा अभाव या सर्व बाबींच्या अनुषंगाने सद्य:स्थितीमध्ये महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार अधिनियम १९६९ चे पुर्नविलोकन करून आवश्यक सुधारणा करण्याची गरज आहे. माथाडी कामगारांना असंघटीत कामगार सामाजिक सुरक्षा अधिनियम २००८ नुसार महाराष्ट्र राज्य सामाजिक सुरक्षा मंडळ अंतर्गत सर्व लाभ उपलब्ध करुन दिल्यास कामगारांचे जीवनमान उंचविण्यास मदत होइल.

## माथाडी मंडळाच्या कार्यालीन कामकाजाबाबत चौकशी समितीची शिफारशी

१. आस्थापना विषयक व प्रशासकीय बाबी संबंधित

१. सर्व मंजूर केलेल्या पदांसाठी सेवा प्रवेश नियम तयार करणे, रिक्त पदांची भरती पारदर्शक प्रक्रियेद्वारे करणे व भरती करतांना बिन्दुनामावालीचे पालन करणे.

२. मंडळाचे लेखा विषयक कामकाजासाठी मंडळावर महाराष्ट्र वित्त व लेखा विभागातील वरिष्ठ अधिकारा-याची नियुक्ती करणे.

३. कार्यालयाला सरकारी इमारतीत स्थानांतरित करण्यासाठी प्रयत्न करणे व आवश्यक ठिकाणी भाडे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून प्रमाणित करून घेणे. स्वमालकीच्या स्थावर मालमत्तेचे कागदपत्र अद्यावत करणे.

४. मंडळातील सर्व खरेदी शासन निर्णयानुसार/ जीईएम पोर्टलद्वारे करणे.

५. मंडळाचे वार्षिक लेखापरिक्षण निर्धारित वेळेवर करणे आणि अहवाल शासनास विहित कालावधीत सादर करणे.

६. बँक मधील मुदत ठेवींच्या गुंतवणूकीशी संबंधित धोके टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजना करणे.

७. सहा गठ्ठा पद्धतीनुसार नस्ती आणि कागदपत्रे तयार करणे व ए, बी, सी, डी वर्गीकरणानुसार नस्ती आणि दस्ताऐवज वर्गीकृत करणे व अनावश्यक कागदपत्रे नष्ट करणे.

८. प्रशासकीय लेव्हीची टक्केवारी पेक्षा अधिक खर्च न करणे.

९. कार्यस्थळातील लैंगिक छळाच्या बाबत "विशाखा मार्गदर्शक तत्त्वानुसार" तक्रारी समिती स्थापन करणे.

२. <u>अधिनियमातील योजने संबंधित</u>

१. सर्व ३६ माथाडी मंडळांचे विलिनीकरन करुन एकच माथाडी मंडळाची स्थापना करणे व एकत्रीत मंडळाला आयुक्त दर्जाच्या प्रशासकीय अधिकाऱ्यांचे नियंत्रणाखाली आणणे.

२. विशिष्ठ प्रकरणे (Case Study) यांचे अनुषंगाने अधिनियमातील जाचक तरतुदींचे पुनर्विलोकन करणे.

३. खंडणी वसूलीची तक्रारींचे अनुषंगाने अधिनिमामध्ये आवश्यक ती सुधारणा करणे.

४. माथाडी कामगारांचे ऑनलाईन नोंदणी, मालकाची नोंदणी, मंजूरीची भरपाई, लेव्ही गोळा करणे, तसेच योजनांच्या अंमलबजावणीकरीता वेब पोर्टल तयार करणे.

५. विविध प्रकारचे बाजारपेठ, व्यवसायगट इत्यादीसाठी लेव्ही लागू करण्यामध्ये एकसमानता आणून लेव्हीचे तर्कशुध्दीकरण करणे व रक्कम रोखीने स्वीकारण्याची पद्दत बंद करणे.

६. माथाडी कामगारांच्या मजुरीमधून पतपेढीचे हप्ते, खाजगी बॅक व संस्थांचे हप्ते इत्यादी कोणतीही अनधिकृत कपात न करणे.

७. माथाडी कामगार व मालकांच्या नोंदणीसाठी विशेष अभियान आयोजित करणे.

८. नोंदणीकृत मालकांची यादी व संबंधित माथाडी कामगारांची यादी पोर्टलवर प्रदर्शित करणे.

९. माथाडी कामगार म्हणून नोंदणी करण्यासाठी किमान व कमाल वयोमर्यादा निश्चित करणे.

१०. माथाडी कामगारांच्या नोंदणीकरीता टोळीतील २/३ सदस्यांच्या मंजूरीची अट काढून टाकणे.

११. सेवा कराच्या कक्षेतून बाहेर राहण्यासाठी काम वाटपाची टोळी पद्धती बंद करणे.

१२. मजुरी निर्धारित करण्यासाठी प्रति वाहन दर सूची रद्द करणे व नमुना १, २ व ३ मध्ये सुधारणा करणे.

१३. पात्र नोंदीत मालक वर्गासाठी मंडळाची भविष्य निर्वाह निधी योजना ईपीएफओ कडे वर्ग करणे.

१४. सर्व नोंदणीकृत माथाडी कामगारांना प्रधान मंत्री जिवन ज्योति विमा योजना (PMJJBY) आणि प्रधान मंत्री सुरक्षा विमा योजना (PMSBY) या योजनांचा लाभ देणे.

१५. माथाडी कामगारांसाठी बॉयो मॅट्रिक उपस्थिती अनिवार्य करणे.

१६. कामाच्या वेळेस माथाडी कामगाराने दर्शनीयभागी ओळखपत्र किंवा बॅच लावणे अनिवार्य करणे.

१७. जेथे आवश्यक असेल तेथे माथाडी कामगारांना गणवेश व सुरक्षा विषयक साधणे पुरविणे.

१८. सर्व माथाडी कामगारांची नियमित आरोग्य तपासणी करणे.

१९. माथाडी रुग्णालयात होणारा प्रशासकीय खर्चावर नियंत्रण आणणे व माथाडी हॉस्पिटल (ट्रस्ट) च्या घटने प्रमाणे विश्वस्त नेमणे.

२०. माथाडी कामगारांच्या कौशल्यवृद्धी साठी प्रशिक्षण आयोजित करणे.

२१. माथाडी कामगारांना असंघटीत कामगार सामाजिक सुरक्षा अधिनियम २००८ मध्ये उल्लेखित योजनांचा लाभ देणे.

२२. व्यवसायीक सामाजिक जबाबदारीतून (CSR) निधी प्राप्त करून माथाडी कामगारांच्या व त्यांच्या कुंटुंबियांच्या कल्याणाकरीता वापरणे.

*********************

# परिशिष्ट १ (मंजूर, भरलेले व रिक्त पदे)

| अ.क्र. | माथाडी मंडळाचे नाव | मंजूर पदे | कार्यरत पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| १ | किराणा बाजार व दुकाने मंडळ | ७० | ३१ | ३९ |
| २ | मुंबई भाजीपाला बाजार असंरक्षित कामगार मंडळ | ३० | २२ | ८ |
| ३ | कापूस बाजार कामगार मंडळ | २३ | १ | २२ |
| ४ | रेल्वे गुड्स क्लिअरींग अॅण्ड फॉरवर्डीग एस्टाब्लिशमेंट लेबर बोर्ड | २६ | २४ | २ |
| ५ | माल वाहतूक कामगार मंडळ | ८० | ३३ | ४७ |
| ६ | दि क्लिअरींग अॅण्ड फॉरवर्डीग गोदि कामगार मंडळ | २० | ३ | १७ |
| ७ | मस्य उद्योग माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ | ० | ० | ० |
| ८ | खोका मेकिंग अॅण्ड टिंबर मार्केट लेबर बोर्ड | २ | २ | ० |
| ९ | मुंबई लोखंड आणि पोलाद बाजार कामगार मंडळ | २८ | ६ | २२ |
| १० | कापड बाजार आणि दुकाने मंडळ | ६२ | ७ | ५५ |
| ११ | धातू आणि कागद बाजार व दुकाने माथाडी कामगार मंडळ | १७ | ७ | १० |
| १२ | अहमदनगर माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ | १६ | १४ | २ |
| १३ | अकोला-वाशिम व बुलढाणा जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ | ५ | ३ | २ |
| १४ | अमरावती माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ | ३ | ३ | ० |
| १५ | औरंगाबाद माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ | १४ | १२ | २ |
| १६ | बीड जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ | ४ | ४ | ० |
| १७ | भंडारा-गोदिंया माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ | ३ | ० | ३ |
| १८ | चंद्रपूर व गडचिरोली जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ | ३ | २ | १ |
| १९ | धुळे-नंदूरबार जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ | ७ | ४ | ३ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २० | इचलकरंजी माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ | ३ | १ | २ |
| २१ | जळगांव माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ | १८ | ९ | ९ |
| २२ | जालना जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ | ७ | ४ | ३ |
| २३ | कोल्हापूर जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ | ९ | ३ | ६ |
| २४ | लातूर - उस्मानाबाद माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ | ९ | ५ | ४ |
| २५ | नागपूर व वर्धा जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ | २९ | ११ | १८ |
| २६ | नांदेड माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ | ५ | ५ | ० |
| २७ | नाशिक माथाडी आणि असंरक्षित कामगार माथाडी मंडळ | २ | २ | ० |
| २८ | नाशिक जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ (लासलगांव) | ६ | ३ | ३ |
| २९ | परभणी - हिंगोली जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ | ४ | ० | ४ |
| ३० | पिंपरी-चिंचवड माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ | १२ | ८ | ४ |
| ३१ | पुणे माथाडी हमाल व इतर श्रमजीवी कामगार मंडळ | २४ | १३ | ११ |
| ३२ | रत्नागिरी-सिंधुदूर्ग माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ | ७ | ० | ७ |
| ३३ | सांगली माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ | १२ | ८ | ४ |
| ३४ | सातारा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ | ९ | ६ | ३ |
| ३५ | सोलापूर जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ | १४ | १४ | ० |
| ३६ | यवतमाळ जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ | ० | ० | ० |
| | एकूण | ५८३ | २७० | ३१३ |

## परिशिष्ट २ (नोंदीत कार्यरत माथाडी कामगार व मालक संख्या)

| अ.क्र. | माथाडी मंडळाचे नाव | कार्यरत नोंदीत मालक | कार्यरत नोंदीत कामगार |
|---|---|---|---|
| १ | किराणा बाजार व दुकाने मंडळ | २६०६ | १६१९४ |
| २ | मुंबई भाजीपाला बाजार असंरक्षित कामगार मंडळ | १६३६ | ४०४० |
| ३ | कापूस बाजार कामगार मंडळ | ६ | २१ |
| ४ | रेल्वे गुड्स क्लिअरींग ॲण्ड फॉरवर्डींग एस्टाब्लिशमेंट लेबर बोर्ड | ४३ | ३९३७ |
| ५ | माल वाहतूक कामगार मंडळ | ४५७४ | १४८४४ |
| ६ | दि क्लिअरींग ॲण्ड फॉरवर्डींग गोदि कामगार मंडळ | १६ | ४६७ |
| ७ | मस्य उद्योग माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ | २० | १२५ |
| ८ | खोका मेकिंग ॲण्ड टिंबर मार्केट लेबर बोर्ड | २७ | ११८ |
| ९ | मुंबई लोखंड आणि पोलाद बाजार कामगार मंडळ | ६९९ | २५२५ |
| १० | कापड बाजार आणि दुकाने मंडळ | ४०१०७ | ३१८४ |
| ११ | धातू आणि कागद बाजार व दुकाने माथाडी कामगार मंडळ | ६३६८ | ३१८९ |
| १२ | अहमदनगर माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ | ७८६ | ३४२५ |
| १३ | अकोला-वाशिम व बुलढाणा जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ | ११२८ | ४०८६ |
| १४ | अमरावती माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ | ३२० | १९७५ |
| १५ | औरंगाबाद माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ | ३७५ | १७६२ |
| १६ | बीड जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ | १७९ | ९५० |
| १७ | भंडारा-गोदिंया माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ | ९ | ३०० |
| १८ | चंद्रपूर व गडचिरोली जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ | १२ | ७२० |
| १९ | धुळे-नंदूरबार जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ | ८०६ | ३०९० |

| | | | |
|---|---|---|---|
| २० | इचलकरंजी माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ | ९९ | ५९७ |
| २१ | जळगांव माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ | ६१७ | ११५५ |
| २२ | जालना जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ | ३३१ | १२५० |
| २३ | कोल्हापूर जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ | ९४८ | ३२२८ |
| २४ | लातूर - उस्मानाबाद माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ | ३२३ | ४९५५ |
| २५ | नागपूर व वर्धा जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ | ५५१ | ५७७३ |
| २६ | नांदेड माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ | २४४ | १०९१ |
| २७ | नाशिक माथाडी आणि असंरक्षित कामगार माथाडी मंडळ | ४९८ | २१६५ |
| २८ | नाशिक जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ (लासलगांव) | १५८८ | ३००० |
| २९ | परभणी - हिंगोली जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ | २७ | ५९५ |
| ३० | पिंपरी-चिंचवड माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ | १३३९ | ५९४० |
| ३१ | पुणे माथाडी हमाल व इतर श्रमजीवी कामगार मंडळ | २७६९ | ६४९० |
| ३२ | रत्नागिरी-सिंधुदूर्ग माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ | २३० | १५२६ |
| ३३ | सांगली माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ | ५६७ | ३१३२ |
| ३४ | सातारा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ | ६५० | १९८१ |
| ३५ | सोलापूर जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ | १९३० | ७६६३ |
| ३६ | यवतमाळ जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ | २१ | ४७० |
| | एकूण | ७२४४९ | ११५९६३ |

## परिशिष्ट ३ (लेव्ही व प्रशासकीय लेव्ही)

| अ.क्र. | माथाडी मंडळाचे नाव | लेव्ही | प्रशासकीय लेव्ही |
|---|---|---|---|
| १ | किराणा बाजार व दुकाने मंडळ | ४१% | २.२१% |
| २ | मुंबई भाजीपाला बाजार असंरक्षित कामगार मंडळ | ४०% | ३.७५% |
| ३ | कापूस बाजार कामगार मंडळ | ४२% | ४% |
| ४ | रेल्वे गुड्स क्लिअरींग ॲण्ड फॉरवर्डींग एस्टाब्लिशमेंट लेबर बोर्ड | ४३% | ३% |
| ५ | माल वाहतूक कामगार मंडळ | ४०% | १.८५% |
| ६ | दि क्लिअरींग ॲण्ड फॉरवर्डींग गोदि कामगार मंडळ | ४५% | ५% |
| ७ | मस्य उद्योग माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ | ३०% | ३% |
| ८ | खोका मेकिंग ॲण्ड टिंबर मार्केट लेबर बोर्ड | ४४.७५% | ६% |
| ९ | मुंबई लोखंड आणि पोलाद बाजार कामगार मंडळ | ४२% | ३.७५% |
| १० | कापड बाजार आणि दुकाने मंडळ | ३७% | ३.१६% |
| ११ | धातू आणि कागद बाजार व दुकाने माथाडी कामगार मंडळ | ३८% | ४% |
| १२ | अहमदनगर माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ | ३२% | ४% |
| १३ | अकोला-वाशिम व बुलढाणा जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ | ३०% | ३.५०% |
| १४ | अमरावती माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ | ३०% | ३% |
| १५ | औरंगाबाद माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ | ३०% | ६% |
| १६ | बीड जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ | ३०% | ६% |
| १७ | भंडारा-गोदिंया माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ | ३५% | ५% |
| १८ | चंद्रपूर व गडचिरोली जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ | ३०% | ३% |
| १९ | धुळे-नंदूरबार जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ | ३०% | ४.५०% |
| २० | इचलकरंजी माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ | ३०% | १.७५% |

| | | | |
|---|---|---|---|
| २१ | जळगांव माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ | ३०% | ४.५०% |
| २२ | जालना जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ | ३०% | ६% |
| २३ | कोल्हापूर जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ | ३०% | ३.७५% |
| २४ | लातूर - उस्मानाबाद माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ | ३०% | ४.५०% |
| २५ | नागपूर व वर्धा जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ | ३०% | ३% |
| २६ | नांदेड माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ | ३०% | ५.५०% |
| २७ | नाशिक माथाडी आणि असंरक्षित कामगार माथाडी मंडळ | ३०% | ४.५०% |
| २८ | नाशिक जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ (लासलगांव) | ३४% | ४% |
| २९ | परभणी - हिंगोली जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ | ३०% | ७% |
| ३० | पिंपरी-चिंचवड माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ | ३०% | २.५०% |
| ३१ | पुणे माथाडी हमाल व इतर श्रमजीवी कामगार मंडळ | ३५% | २.५०% |
| ३२ | रत्नागिरी-सिंधुदूर्ग माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ | ३०% | ४% |
| ३३ | सांगली माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ | ३०% | ३% |
| ३४ | सातारा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ | ३०% | ३% |
| ३५ | सोलापूर जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ | ३०% | ५% |
| ३६ | यवतमाळ जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ | ३०% | ४% |
| | सरासरी | ३३.५८% | ३.९८% |